# साधन

होते आहे असेल एकची  परब्रह्म
अंश त्याचे अनेक तेही नामे ब्रह्म

अंश परब्रह्माचा विशाल विश्वाहून
राही सहज साऱ्या चराचरा व्यापूनी

अंश एक असा ज्याचे नाम नादब्रह्म
इतरही नामे जशी सूर ताल  शब्दब्रह्म

भासे माया लावी वेड परी ब्रह्म तेही
जीव शिव मीलनाचे साधनही तेची

– नारायण
०९/१४/२३